अश्विनी भिडे भा.प्र.से.
सचिव,
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
महाराष्ट्र शासन,
मंत्रालय, मुंबई ३२.

दि. ५ सप्टेंबर, २०१४

प्रिय शिक्षक बंधू भगिनींनो,

नुकतेच शैक्षणिक वर्ष सुरू झाले आहे, राज्यभर मोठ्या उत्साहाने शाळा सुरू झाल्या आहेत. राज्याची शिक्षण सचिव म्हणून प्रथम मी आपणा सर्वांचे हार्दिक अभिनंदन करते आणि शिक्षकदिनानिमित्त आपणास मन:पूर्वक शुभेच्छा देते!

शिक्षण आणि शिक्षक यांचे केवळ औपचारिक महत्त्व सांगण्यासाठी मी आपल्याशी हा संवाद करीत नाही. असा संवाद गेली ६० वर्षे आपण करीत आलो आहोत. शिक्षण, समाज, शासन आणि प्रशासन यातील हळव्या भावबंधांच्या नात्यांचे विविध पैलू संवेदनशीलपणे उलगडण्यासाठी आपल्याशी हा संवाद!

कोणत्याही समाजाची उंची त्याच्या शिक्षणापेक्षा अधिक नसते आणि कोणत्याही शिक्षणाची उंची त्याच्या शिक्षकांपेक्षा अधिक नसते, या विचारांचा धागा पकडून मी आपल्याप्रती कृतज्ञता व्यक्त करते. राज्याचा शैक्षणिक दर्जा वृद्धिंगत करण्यासाठी आपल्या सामूहिक प्रयत्नाला आणि कृतीशील सामर्थ्याला प्रत्यक्षात साकार करण्याचे मी मनस्वी आवाहन करते!

माझ्या शिक्षक बंधू–भगिनींनो, मोठ्या विश्वासाने आईवडील आपल्या पोटच्या मुलाला शाळा नावाच्या ज्ञानमंदिरी आणून सोडतात. आपण या कोवळ्या बालकाच्या विकासाची शाश्वती पालकांना देतो. आई वडिलांच्या दृष्टीने सर्वाधिक महत्त्वपूर्ण गोष्ट म्हणजे त्यांच्या बालकांचे शिक्षण. आपण बालकांच्या उत्कर्षाचे आणि सर्वांगीण विकासाचे शिल्पकार आहात, याचा माझ्यासह तुम्हा सर्वांना अभिमान वाटायला हवा, पण वास्तव वेदनादायी आहे.

प्रसारमाध्यमे दररोज शिक्षणक्षेत्राविषयी नवनवी भाष्ये करतात. विविध माध्यमांतून शालेय शिक्षणाचे विदारक चित्र उभे करण्यात येते. या सर्वांच्या अभिप्रायांचा सारांश एकच असतो. 'शाळेतील मुलांना काहीच येत नाही', 'पाचवीच्या मुलांना दुसरीचे पुस्तक वाचता येत नाही' आणि 'सातवीचा विद्यार्थी चौथीचे गणित सोडवू शकत नाही', हे वाचताना–ऐकताना होणाऱ्या वेदना आपणा सर्वांना व्यथित करतात.

यावर उपाययोजना म्हणून इयत्ता दुसरी ते पाचवीसाठी आपण नुकताच एक छोटासा प्रकल्प प्रायोगिक तत्त्वावर राबवला. राज्यशासन आणि प्रथम फौंडेशनच्या संयुक्त विद्यमाने 'वाचन, लेखन व गणित विकास कार्यक्रम' या नावाने हा उपक्रम राबविण्यात आला. शिक्षण संचालनालय, विद्या परिषद आणि महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांच्यातील उत्कृष्ट समन्वयामुळे हा पथदर्शी कार्यक्रम यशस्वी झाला. तुमच्यासारख्याच शाळेत, तुमच्यासारख्याच जिल्हा परिषद शिक्षकांनी तो कार्यान्वित केला. ३५ जिल्ह्यातल्या प्रत्येकी एका तालुक्यातील १०० शाळांमध्ये आपल्याच शिक्षकांनी हा प्रयोग केला. त्यांनी वेगळे काही केले नाही. दुपारच्या भोजनापूर्वीच्या दोन तासिकांमध्ये प्रत्यक्ष कृतीद्वारा अध्यापन केले. मुलांमध्ये मिळून मिसळून हसतखेळत शिकवले. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेनुसार त्यांचे गट केले. मुलांमधील नेमक्या उणिवा हेरून त्यांना शिकवले. शब्द व वाक्यांचा वारंवार सराव देऊन गणिती उदाहरणांचा खूप सराव करून घेतला आणि १०० दिवसांत अक्षरश: चमत्कार झाला.

शिक्षक मित्रांनी केलेल्या या प्रामाणिक प्रयत्नांचे फळ विश्वास बसणार नाही इतके कौतुकास्पद आहे. या प्रयोगापूर्वी इयत्ता दुसरीतील फक्त ७०% विद्यार्थी शब्द वाचू शकत होते. शिक्षक मित्रांनी केलेल्या या १०० दिवसांच्या प्रयत्नाने शब्द वाचू शकणाऱ्या मुलांचे प्रमाण ९०% पर्यंत वाढले. या प्रकल्पापूर्वी फक्त ५३% विद्यार्थ्यांना वाक्य वाचता येत असे. या प्रयत्नानंतर ७५% विद्यार्थी वाक्ये वाचू लागले. या उपक्रमापूर्वी केवळ ३४% विद्यार्थी उतारा वाचू शकत होते. शिक्षक मित्रांनी केलेल्या या प्रामाणिक प्रयत्नानंतर ५३% विद्यार्थी उतारा वाचू लागले. श्रुतलेखन करू शकणाऱ्या ६०% विद्यार्थ्यांचे प्रमाण या १०० दिवसांच्या प्रयत्नानंतर ७६% झाले. आपल्याच शिक्षक बांधवांनी केवळ १०० दिवस केलेल्या प्रयत्नांमुळे वाचन-लेखन कौशल्यात २०% वाढ होऊ शकली. गणितातही संख्या ओळखण्याचे प्रमाण ७३% वरून ८८% वर गेले. हातच्यांची बेरीज करता येणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण ६९% वरून ८५% वर गेले. आपल्याच शिक्षकमित्रांनी प्रामाणिकपणे केलेल्या सकारात्मक प्रयत्नांचे हे फलित होय.

अर्थातच केवळ वाचन, लेखन आणि गणित सोडविता येणे म्हणजे शिक्षण नाही. तथापि ही प्राथमिक कौशल्ये विकसित करणे आवश्यक आहे, जेणेकरून मुलांना त्या पुढील टप्प्यावरील ज्ञानार्जन अधिक सहजतेने करणे शक्य होईल. मुलांना त्यांच्या क्षमतांची जाणीव करून देऊन त्या विकसित करण्यासाठी पोषक वातावरण उपलब्ध करून देणे, तसा आत्मविश्वास त्यांच्यात निर्माण करणे आणि या क्षमता अवगत करून देण्यासाठी त्यांना मदत करणे ही शासनाची-पर्यायाने शिक्षकांची जबाबदारी आहे. ज्ञानरचनावादाचा केवळ तत्त्वविचार म्हणून स्वीकार करणे पुरेसे नाही. तो प्रत्यक्ष वर्गसंचालनात अंगीकारणे आवश्यक आहे. प्रत्येक व्यक्तीतील बहुआयामी बुद्धिमत्ता (Multiple Intelligence) विचारात घेऊन आपल्या कामाचे नियोजन करणे आवश्यक आहे. कोणतीही मुले शिक्षणात, शैक्षणिक संपादणुकीमध्ये मागे पडता कामा नयेत हे शिक्षण हक्क कायद्यात अभिप्रेत आहे. मागे पडणाऱ्या मुलांकडे विशेष लक्ष देऊन त्यांना अपेक्षित क्षमता अवगत करण्यास मदत करणे महत्त्वाचे आहे.

पाठ्यपुस्तके, धडे आणि अभ्यासक्रम पूर्ण करण्याच्या आणि अन्य कामांच्या व्यापातही वर्गातील सर्व मुलांच्या मूलभूत क्षमतांचा सर्वार्थाने विकास घडवून आणणे हे अगदी सहज शक्य आहे.

३५०० शाळांमध्ये १०५०० शिक्षक बंधू भगिनींनी सातत्यपूर्ण परिश्रम आणि अविरत प्रयत्नांतून शाळेच्याच वेळात, उपलब्ध असलेल्या शैक्षणिक साहित्यांतून हे शक्य आहे हे दाखवून दिले आहे. त्यांनी हे सकारात्मक बदल अवघ्या १०० दिवसात घडवून आणले. हा प्रायोगिक तत्त्वावरील कार्यक्रम या शैक्षणिक वर्षात राज्यभर कार्यान्वित करण्याचा आपला मानस आहे. विद्या परिषदेद्वारे त्याचे नियोजन सुरू आहे. आपण सर्वांनी या बदलाच्या प्रक्रियेत मनापासून सहभागी व्हावे आणि सकारात्मक बदलाचे दूत होऊन गुणवत्ता विकासाची प्रक्रिया गतिमान करावी हे सांगण्यासाठी हा पत्रप्रपंच.

आपणही आपल्या शाळांमध्ये दैनंदिन अध्ययन, अध्यापनाला कृतीशीलतेची, उपक्रमशीलतेची व उत्साहाची जोड दिल्यास आपणही गुणवत्ता विकासाची प्रक्रिया गतिमान करू शकाल, अशी मला आशा वाटते. अशा प्रयत्नांसाठी मी आपणास हार्दिक शुभेच्छा देते. आपल्या या प्रयत्नातून महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्राला एक नवी उंची प्राप्त होईल याची मला खात्री आहे.

अश्विनी भिडे भा.प्र.से.
सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ३२.